दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/विधी/४२१/२०१९/२० दिनांक : २३/११/१९

प्रति,
मा. सदस्य सचिव
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष**

**विषय :-** राज्यस्तरीय कांदळवन संवर्धन व संरक्षण समितीच्या दि. 20/9/2019 रोजी झालेल्या बैठकीतील सुचनेनुसार केलेल्या पुर्ततेबाबतचा अहवाल.

**संदर्भ :-** 1) दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या आठव्या बैठकीचे इतिवृत्तांत
2) आपलेकडील पत्र ऑक्टो 2019, जाक्र.ल.ले/71/2019-20

**मा. महोदया,**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कांदळवनाच्या क्षेत्रात झालेल्या अतिक्रमणाबाबत तसेच मातीभरावाबाबत तक्रारदार श्री. धिरज परब व इतर यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे विविध तक्रारी अर्ज दाखल केले आहेत.

सदर तक्रारीच्या अनुशंगाने मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि. 20/9/2019 रोजी कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची आठवी बैठक घेण्यात आली होती. तसेच श्री. धिरज परब यांनी केलेल्या महानगरपालिका क्षेत्रातील तक्रारीनुसार तहसिलदार, ठाणे यांचेमार्फत दि. 08/02/2019 व दि. 08/03/2019 रोजी कांदळवन उपसमितीच्या सदस्यांनी केलेल्या स्थळपाहाणी अहवालानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करणेकरीता संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये निर्देश देऊन व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेस विनंती केलेली आहे. तरी तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारींच्या अनुशंगाने महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीची तक्रारनिहाय माहिती सोबत जोडून देत आहे.

आपला,
13/11/19

**बालाजी खतगावकर**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**तक्रार क्र. ४२** :- प्रभाग समिती क्र.१ मुर्धा खाडी व परिसरात सर्रास कांदळवन, सी.आर.झेड. व पाणथळ मध्ये बेकायदा झाडे तोडुन डेब्रिस, दगड माती भराव करुन मोठ्या संख्येने बेकायदा बांधकामे बाबत.

**महानगरपालिकेमार्फत केलेल्या कार्यवाहीची माहिती :-**

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार श्री. धिरज परब यांच्या समवेत मुर्धा खाडी व परीसरात मनपा स्तरावर प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता सदर पाहणी अनुषंगाने कच्चे नाल्याच्या पलीकडे असलेली कच्ची व पक्की बांधकामे सरकारी जागेवर असून सदरची बांधकामे जुनी व रहिवास व्याप्त आहेत. सदर घरांना सन १९९९ पासुन ते २००६ पर्यंत मालमत्ता कराची आकारणी झालेली आहे. सदरची सरकारी जागा ही मीठ विभाग व महसुल विभागाची आहे.

तरी दि.२५/०९/२०१९ रोजीच्या प्रभाग समिती क्र.०१ कनिष्ठ अभियंता यांच्या पाहणीनुसार सदर जागेवर नव्याने बांधकाम झाल्याचे, सदर परीसराच्या आजुबाजुस मातीभराव झाल्याचे व कांदळवन तोडल्याचे दिसुन येत नाही.

सदर सरकारी जमिनीवर होणाऱ्या अतिक्रमण / बांधकामाबाबत सरकारी जागा महसूल विभागाच्या मालकीची असल्यामुळे १) महसूल व वन विभाग (मंत्रालय)यांचे क्र. जमीन०३/२००९/प्र.क्र.१३/ ज-१ दि.०७/०८/२०१० चे शासन परिपत्रक २) महसूल व वन विभाग (मंत्रालय)यांचे क्र. जमीन०७/२०१३/प्र.क्र.३७४/ज-१, दि. १०/१०/२०१३ या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने शासकीय जागेवरील होत असलेल्या बांधकामाबाबत महसुल विभाग व मीठ विभाग यांना वेळोवेळी कळविण्यात येते. तसेच निदर्शनास येत असलेल्या चालु कच्च्या बांधकामावर महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

बालाजी खतगावकर
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**तक्रार क्र. 44 :-** तक्रारदार श्री. धिरज परब दि.09/01/2019 नुसार भाईंदर पश्चिम येथे खाडी किनारी जुना धक्का असताना बाजूलाच कांदळवन व पाणथळ चा ऱ्हास करून आणखी एक जेट्टीचे बांधकाम मेरीटाईम बोर्डाने सुरू केल्याने पर्यावरणाचा ऱ्हास.

**महानगरपालिकेमार्फत केलेल्या कार्यवाहीची माहिती :-**

सदर जागेवर जेट्टीचे बांधकाम महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड मार्फत सुरू आहे. सदर तक्रारीबाबत महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड यांच्या मार्फत कार्यवाही होणे करीता पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.

बालाजी खतगावकर
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका